## शब्दांची रुपे

शब्दांची कित्ती रुपे..
टिपतात भावनांचे विविध क्षण,
कधी खेळते हसु ओठांवर,
अन कधी आगतिक विषण्ण मन !

शब्दांची कित्ती रूपे..
नि:शब्द होऊन जगतात,
कधी आतल्या आत खळबळ,
कधी ओठांवर थबकतात !
शब्दांची कित्ती रूपे..
वेलांट्या आणि उकार,
कधी अर्थवाही प्रवाह,
कधी अर्थहीन-चुकार !
शब्दांची कित्ती रूपे,
लेख, काव्य अन कथा..
कधी एक सुखानंद,
कधी शापित व्यथा..

शब्दांची कित्ती रूपे,
अव्यक्तातले तू - मी.
कधी प्रेमाचे भरते,
कधी असा तू - तशी मी...
शब्दांची कित्ती रूपे,
कडक अन हळुवार..
कधी मध्यान्हीचे उन,
कधी बसंत - बहार !!!

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**